| | | |
|---|---|---|
| | वाकड पोलीस ठाणे,<br>पोलीस आयुक्तालय, पिंपरी - चिंचवड | |
| | **प्रेसनोट** | दिनांकः १४/०९/२०२४ |

## चारित्र्याच्या संशयावरुन प्रेयसीचा गळा आवळून निर्घुन खुन करुन सराईत आरोपीस सोलापुर येथून वाकड पोलीस ठाणे तपास पथक यांचेकडून शिताफीने अटक

---

दिनांक ११/०९/२०२४ रोजी रोजी सकाळी ०७:०० वा. चे सुमारास सम्राट कॉलनी नं.०४, जगतापनगर, थेरगाव, पुणे येथे ऑटो रिक्षामध्ये एक महिला बेशुध्द अवस्थेत आहे. खबर मिळताच वाकड पोलीस स्टेशनकडील अधिकारी व अंमलदार तात्काळ घटनास्थळी पोहचले. तेथे रिक्षा क्र. एमएच १४ एचएम ३५७२ मधील पाठीमागील सिटवर अंदाजे २६ वर्षे वयाची महिला बेशुध्द अवस्थेत पडलेली होती. तिच्या गळ्यावर काळा-निळा व्रण दिसत होता. तात्काळ डॉक्टरांना बोलावून वैद्यकीय तपासणी केली ती मयत झाल्याचे सांगितले. सदर मयत महिलेबाबत आजुबाजूच्या परिसरात माहिती घेतली असता, सम्राट कॉलनी नं. ०४ मध्ये राहणारे राजवंती लकमीचंद भुंबक यांची ती मुलगी असून तिचे नाव शिवानी सोमनाथ सुपेकर लग्ना अगोदरचे नाव संतोषी लकमीचंद भुंबक वय २८ वर्षे, पत्ता- वडगाव मावळ, पुणे असे असल्याचे समजले. मयत महिलेचा नवरा मयत झाला असून काही वर्षापासून ती विनायक अनिल आवळे, रा. पेट्रोलपंपाचे मागे, काळेवाडी, पुणे यांचेसोबत राहत असल्याचे समजले.

सदर घटनेची माहिती वरिष्ठांना कळविलेनंतर पोलीस उप आयुक्त, परि - २ व सहा. पोलीस आयुक्त, वाकड विभाग असे घटनास्थळी पोहचले तेथे उपस्थित असलेले वाकड पोलीस ठाण्याचे वपोनि., पोनि. गुन्हे तसेच तपास पथकाचे अधिकारी व अंमलदार यांना आरोपीचा शोध घेऊन अटक करणे व गुन्ह्याचे तपासाचे अनुषंगाने मार्गदर्शन करुन सुचना दिल्या. मयत महिला मिळून आलेल्या रिक्षाचे क्रमांकावरुन मालकाकडे चौकशी करता सदरची रिक्षा ही भाडेतत्त्वावर विनायक अनिल आवळे यास चालविण्यास दिली आहे. त्याचे राहते पत्त्यावर जाऊन पाहत विनायक अनिल आवळे हा घरी आला नसल्याचे समजले. त्याप्रमाणे मयत हिची बहिण नामे शारदा नवीन जोशी, वय ३५ वर्षे, धंदा- गृहिणी, गणेशनगर, कॉलनी नं.०७, कातके यांची इमारत, बोपखेल, पुणे हिचे तक्रारीवरुन विनायक अनिल आवळे याचेविरुध्द वाकड पोलीस ठाणे, गु.र.नं. ९९०/२०२४ भारतीय न्याय संहिता सन २०२३ चे कलम १०३(१), २३८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

खुनासारख्या गंभीर गुन्ह्याचे घटनेचे गांभीर्य पाहुन मा. पोलीस आयुक्त, पोलीस सह आयुक्त, पोलीस उपायुक्त परि-२, सहायक पोलीस आयुक्त, वाकड विभाग यांनी अज्ञात आरोपी शोध घेणेकरिता आदेशीत केले. त्याप्रमाणे वपोनि. निवृत्ती कोल्हटकर यांनी पोनि. गुन्हे गोरख कुंभार, तपास पथकातील अधिकारी व अंमलदार यांच्या दोन पथके तयार करुन आरोपीचा शोध घेणेबाबत सांगितले. घटनास्थळाचे आजुबाजूचे सीसीटीव्ही फुटेज व गोपनीय माहितीच्या आधारे आरोपीचा पिंपरी चिंचवड, पुणे परिसरात शोध सुरु केला. आरोपी हा सराईत गुन्हेगार असल्याने तो त्याचे अस्तित्व लपवून परागंदा झाला होता. आरोपी हा विजापुर, कर्नाटक येथे पळून गेल्याचे खात्रीशीर माहिती प्राप्त झाली. वरिष्ठांचे परवाणगीने तात्काळ आरोपीचा शोध घेणेबाबत तपास पथकातील पोउपनि. सचिन चव्हाण व अंमलदार यांचे तपास पथक रवाना केले. आरोपी हा विजापुर येथून परत सोलापुरच्या दिशेने प्रवास करीत असताना तपास पथकाने पाठलाग करुन दिनांक १३/०९/२०२४ रोजी सोलापुर रेल्वे स्टेशन परिसरातून शिताफिने ताब्यात घेतले. आरोपी **विनायक अनिल आवळे, वय ३५ वर्षे, रा. एम.एम. चौकाजवळ, पेट्रोल पंपाच्या पाठीमागे, काळेवाडी, पुणे** हा सराईत आरोपी असल्याने त्याचेकडे कौशल्यपुर्ण तपास केलेनंतर त्याने मयत महिलेच्या चारित्र्यावर संशय आल्याने तिचा त्याचे राहते घरामध्ये गळा आवळून दिनांक १२/०९/२०२४ रोजी मध्यरात्री खुन करुन तिचा मृतदेह रिक्षामध्ये ठेवून ती रिक्षा मयत महिलेचे आई-वडील राहत असलेल्या सम्राट कॉलनी, थेरगाव येथील गल्लीमध्ये पार्क करुन पळून गेला होता. नमूद आरोपीने गुन्हा केल्याचे

आरोपी विनायक अनिल आवळे याची गुन्हेगारी पार्श्वभुमी खालिलप्रमाणे.

| अ.क्र. | पोलीस ठाणे | गु.र.नं. | अधिनियम व कलम |
|---|---|---|---|
| १. | पुणे रेल्वे | १४३/२०१३ | भादंवि कलम ३७९,३४ |
| २. | भोसरी | ११०/२०१६ | भांदवि कलम ३०७,४५२,१४३,१४७,१४९,५०६ आर्म ॲक्ट ४,२५ मपोका ३७(१)(३) सह १३५ प्रमाणे |
| ३. | भोसरी | ११०/२०१९ | आर्म ॲक्ट ४,२५ व इतर |
| ४. | पिंपरी | १२०८/२०२० | भादंवि कलम ३२४,३२३ |
| ५. | वाकड | ८०१/२०२४ | एनडीपीएस ॲक्ट कलम ८(क), २०(ब)(ii)(अ) |

खुनासारखा गंभीर गुन्ह्यातील सराईत आरोपीस अथक परिश्रमाने अटक केली. गुन्ह्याचा कौशल्यपुर्ण तपास करुन सदरचा गुन्हा अल्पावधीत उघडकीस आणण्याची उल्लेखनीय कामगिरी मा. श्री. विनयकुमार चौबे सो, पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड, मा.डॉ. शशीकांत महानवर, पोलीस सह आयुक्त, मा. श्री. वसंत परदेशी, अपर पोलीस आयुक्त, श्री. विशाल गायकवाड सो, पोलीस उप आयुक्त, परि-२, श्री. सुनिल कुराडे, सहा. पोलीस आयुक्त सो, वाकड विभाग यांचे मार्गदर्शना खाली वाकड पोलीस ठाणेकडील श्री. निवृत्ती कोल्हटकर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. गोरख कुंभार, पोनि. (गुन्हे), सपोनि. अर्जुन पवार, पोउपनि. सचिन चव्हाण, पोउपनि.अनिरुध्द् सावर्डे, श्रेणी पोउपनि. बिभीषण कन्हेरकर, श्रेणी पोउपनि. राजेंद्र काळे, पोलीस अंमलदार वंदु गिरे, संदिप गवारी, स्वप्निल खेतले, प्रमोद कदम, अतिश जाधव, अतिक शेख, प्रशांत गिलबिले, रामचंद्र तळपे, अजय फल्ले, सौदागर लामतुरे, भास्कर भारती, प्रशांत गिलबिले, रमेश खेडकर, ज्ञानदेव झेंडे, सागर कोतवाल, मंगेश लोखंडे (परि-२) यांनी मिळुन केली आहे. सदर गुन्ह्याचा तपास सपोनि. अर्जुन पवार हे करीत आहेत.

**(विशाल गायकवाड)**
पोलीस उप आयुक्त,
परिमंडळ -२, पिंपरी चिंचवड